जनसंपर्क कक्ष
29 APR 2018
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### मुंबईच्या जबाबदारीतून मुक्तता : प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा

# कुलगुरुंना मिळेल आता शिवाजी विद्यापीठास वेळ

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मुंबई विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरु मिळाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या कामकाजास कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना वेळ देता येईल. त्यामुळे प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यासह विविध उपक्रमांना गती मिळेल, अशी अपेक्षा विद्यापीठातील घटकांतून व्यक्त होत आहे.

जुलै २०१७ मध्ये मुंबई विद्यापीठातील उत्तरपत्रिका तपासणीच्या कामासाठी मदत करण्याची सूचना कुलपती कार्यालयाने शिवाजी विद्यापीठाला केली. त्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यावर कुलपती कार्यालयाने दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी सोपविला. यानंतर गेल्या आठ महिन्यांत मुंबई विद्यापीठातील कामकाजामध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांचा अधिकतर वेळ व्यतीत होऊ लागला. एखादा कार्यक्रम, महत्त्वाच्या विषयांवरील बैठकीपुरतेच शिवाजी विद्यापीठात त्यांचे येणे होऊ लागले. त्याचा परिणाम प्रशासकीय पातळीवरील कामकाजावर झाला. गेल्या महिन्यात जाहीर झालेल्या 'नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क' (एनआयआरएफ)च्या मानांकनामध्ये देशातील शंभर विद्यापीठांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाला स्थान मिळविता आले नाही. यावर हे मानांकन घसरण्यास कुलगुरू जबाबदार असल्याचा आरोप शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) केला. 'नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया'च्या (एनएसयूआय) कोल्हापूर शाखेने 'कुलगुरु हरवले' अशा स्वरूपातील पत्रके विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर लावून निषेध व्यक्त केला. कुलगुरुंच्या विद्यापीठातील अनुपस्थितीबाबत विविध घटक, संघटनांकडून नाराजी व्यक्त केली जात होती. त्यातच कुलगुरू डॉ. शिंदे यांची मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड होण्याची चर्चा सुरु होती. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. सुहास पेडणेकर यांची निवड झाल्याने जबाबदारीतून डॉ. शिंदे मुक्त होणार आहेत. त्यामुळे विद्यापीठातील कामकाज, विविध घटकांचे प्रलंबित प्रश्न, उपक्रमांना गती देतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### 'एनआयआरएफ', 'नॅक'ची तयारी महत्त्वाची


शिवाजी विद्यापीठाने सन २०१४ मध्ये 'अ' मानांकन मिळविले. यानंतरच्या वर्षी 'एनआयआरएफ'च्या मूल्यांकनात देशात २८ वा क्रमांक पटकविला. मात्र, यावर्षी 'एनआयआरएफ'च्या मानांकनात पहिल्या शंभर संस्थांमध्ये विद्यापीठाला स्थान मिळविता आले नाही. विद्यापीठ एक वर्षानंतर 'नॅक'च्या मूल्यांकनाला सामोरे जाणार आहे. त्यापूर्वी 'एनआयआरएफ'चे मानांकन होईल. त्याची विद्यापीठाकडून आतापासून तयारी होणे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने कुलगुरुंकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

"आव्हानात्मक स्थितीमध्ये मुंबई विद्यापीठाची जबाबदारी कुलपतींनी माझ्यावर सोपविली. शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण कामाच्या वारशामुळे मला ही संधी मिळाली. संवाद, संपर्क व सहभाग या त्रिसूत्रीने काम करुन ही जबाबदारी यशस्वीपणे पार पडल्याचे मला समाधान आहे.

-डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु

"विद्यापीठाचे मानांकन ढासळले आहे. ते वाढविण्याच्या दृष्टीने कुलगुरुंनी आता अधिक जबाबदारीने आणि पूर्ण क्षमतेने काम करण्याची गरज आहे. प्रशासन आणि विविध अधिकार मंडळांच्या कामकाजामध्ये त्यांनी लक्ष द्यावे.

- सुधाकर मानकर, मार्गदर्शक, 'सुटा'



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 APR 2018
पुढारी

# डिझाईनिंगच्या क्षेत्रात करिअरला मोठी संधी

## पालकमंत्री पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डिझाईनिंग क्षेत्रात करिअरला संधी असून तरुण पिढीने रोजगाराची संधी उपलब्ध असणारे कोर्स करावेत. शहरातील डिझाईन शैक्षणिक संस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्न कलाप्रबोधिनीज इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या कामाच्या प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निर्मिती ग्राफिक्सचे अनंत खासबारदार होते. जयंत बेगमपुरे, विजय गजबर यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री पाटील म्हणाले, कोल्हापुरात कलाक्षेत्राचा वारसा जपणाऱ्या अनेक संस्था आहेत. अनेक विद्यार्थ्यांना यामुळे रोजगार प्राप्त झाला आहे. अशा संस्थांचा उपयोग नव्या पिढीला होणे गरजेचे आहे. त्यासाठी या संस्थांची माहिती सांगणारा एकत्र माहितीपट तज्ज्ञ लोकांच्या मदतीने करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी खासबारदार यांनी अनुभवातून डिझाईन या विषयावर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील बॅचलर ऑफ डिझाईनच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध डिझाईन प्रदर्शन २९ एप्रिल अखेर नागाळा पार्क येथील संस्थेच्या हॉलमध्ये सुरू राहणार आहे. प्रदर्शनात रेसिडेन्शियल, कमर्शियल, प्रोजेक्ट, मॉडेल्स यांचा समावेश आहे. तर मास्क आणि टी-शर्ट पेंटिंग, ग्राफिक डिझाईन मॉडेल्सचे असंख्य प्रकार प्रदर्शनात मांडण्यात आले आहेत.

यावेळी डॉ. गिरीष कुलकर्णी, मोहन वायचळ, जयंत बेगमपुरे, गिरीजा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

29 APR 2018 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातून

# पदवी स्तरावरच विद्यार्थ्यांना दोन पेटंट

## दहा आंतरराष्ट्रीय शोधनिबंध; शिवाजी विद्यापीठ नॅनो सायन्स विभागाचा चढता आलेख

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाच्या पहिल्या पंचवार्षिक बॅचने आंतरराष्ट्रीय ख्यातीची दमदार कामगिरी करून दाखविली. दोन विद्यार्थ्यांच्या नावावर पेटंट तसेच एम.एस्सी. च्या अंतिम वर्षातील दहा विद्यार्थ्यांनी दहा आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमध्ये आपले शोधनिबंध प्रकाशित केले. यातील सात विद्यार्थ्यांची निवड दक्षिण कोरिया आणि तैवान येथील विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये पीएच.डी. साठी झाली आहे. विद्यापीठाच्या नावलौकिकात या विभागाचा वाटा मोठा असल्याची माहिती विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

पाटील म्हणाले, संशोधनाला प्रोत्साहन म्हणून दरवर्षी दहा विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या वतीने फेलोशिप देण्याचा निर्णय यापूर्वी घेण्यात आला आहे. एकूणच नॅनो सायन्स हा विभाग विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकवत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त शासनाच्या विशेष अनुदानातून पाच वर्षांपूर्वी स्कूल ऑफ नॅनो-सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागाची स्थापना करण्यात आली. बी.एस्सी., एम.एस्सी. (एकत्रित) अभ्यासक्रमाची पहिली बॅच सन २०१६-१७ मध्ये उत्तीर्ण होऊन बाहेर पडली आहे. या पहिल्या बॅचच्या अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले संशोधनाचे कसब सिद्ध करून घवघवीत यश मिळविले आहे. त्यांच्यामुळे हा अभ्यासक्रम सुरू करण्याचा विद्यापीठाचा निर्णय अत्यंत योग्य असल्याचे स्पष्ट झाले.

या विभागातील आठ विद्यार्थ्यांची प्रिंगर नेचर या आंतरराष्ट्रीय प्रकाशन समूहात सायन्टिफिक रायटर या पदावर नियुक्ती झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांना जगमान्य विद्यापीठांची फेलोशिप मिळाली आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून या विभागात एम.फिल. आणि पीएच.डी. अभ्यासक्रमही सुरू होत आहेत.